# माणूस



सुधीर शास्त्री

# माणूस

हा काव्यसंग्रह ई साहित्य प्रतिष्ठानच्या वाचकांना ई स्वरुपात विनामूल्य उपलब्ध करून दिल्याबद्दल ई साहित्य प्रतिष्ठान कवी श्री सुधीर शास्त्री यांचे आभारी आहे.

या पुस्तकाचे ई प्रकाशन व विनामूल्य वितरण करण्यास परवानगी दिल्याबद्दल आम्ही अनघा प्रकाशनचे आभारी आहोत.

या पुस्तकावरील आपले अभिप्राय श्री सुधीर शास्त्री यांना 9867994109 या क्रमांकावर कळवावे.

धन्यवाद

सुनीळ सामंत
टीम ई साहित्य
esahity@gmail.com
www.esahity.com
Whatsapp: 99877 37237
ई प्रकाशन – २३ एप्रिल २०२५

# माणूस

**सुधीर पं. शास्त्री**

अनघा प्रकाशन

**प्रकाशन क्रमांक : ८१५**

**MANUS**

---

**माणूस (काव्यसंग्रह)**

❖ **प्रकाशिका** : **सौ.विद्या मुरलीधर नाले**
अनघा प्रकाशन
१६, श्री सद्दिच्छा, मीठबंदर रोड, चेंदणी,
ठाणे (पूर्व) - ४०० ६०३

❖ **ई-मेल** : anghaprakashan@rediff.com

❖ **संकेत स्थळ** : www.anghaprakashan.com

❖ **संपर्क दूरध्वनी** : ९७६१६ ०३२३१

❖ **प्रकाशनाधिकार** : **सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन**

© : **सौ. कीर्ती सुधीर शास्त्री**
एच- ६/३०२, गुलमोहर सह.गृ.नि.संस्था,
प्रतीक्षानगर, सायन (पूर्व)
मुंबई - ४०० ०२२
९८६७२ ५३०३२
kirtisshastri@gmail.com

❖ **मुखपृष्ठ** : श्री.नितीन निगडे

❖ **मुद्रितशोधन** : श्रीमती उमा नाबर

❖ **प्रथम आवृत्ती** : २६ जानेवारी २०२४

❖ **शासन अनुदानित मूल्य** : रु.५६/-

❖ **मुद्रक** : श्री शिव क्रिएशन, पुणे

❖ **संगणक अक्षरजुळणी** : श्री.किशोर पोतदार, भायंदर वेस्ट
: श्री.जीवन सुतार, ठाणे

❖ **ISBN** : 978-81-969369-6-9

---

**या पुस्तकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या नवलेखक अनुदान योजनेत अनुदान मिळाले आहे. तथापि या पुस्तकातील विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.**

# अर्पण पत्रिका

**तीर्थरूप अण्णा**

व

**आई**

यांना कृतज्ञतापूर्वक अर्पण.



# प्रस्तावना

## जीवनानुभूतीचे मानस तरंग 'माणूस'

संवेदनाच्या सोबतीने मनात उमटणाऱ्या भावकंपनांना शब्दबद्ध करणाऱ्या कविता घेऊन कवी श्री.सुधीर शास्त्री रसिकांसमोर येत आहेत, त्यांचे मनापासून अभिनंदन करून कवितेच्या प्रांगणात स्वागत करण्याच्या भावनेने या शुभेच्छा देताना मला आनंद होत आहे.

सुधीर शास्त्री यांच्या कवितेतून प्रीती, जीवन चिंतन, निसर्ग, मनातील अव्यक्त सल, सामाजिक विषमता, हरवत चाललेले माणूसपण असे अनेकविध विषय येतात. कधी छंद तर कधी मुक्तछंदातून संवादी भाषाशैलीतून ते व्यक्त होतात. प्रतिभा हीच त्यांची आंतरिक सखी आहे. तीच कवीची संवेदनात्मक सोबत आहे. या प्रतिभेच्या साथीनेच आपले जगणे सुंदर झाले आहे, ही कवीची भावना आहे आणि त्याचे प्रत्यंतर 'तू' ह्या कवितेपासूनच येते. या कवितेतून कवी सुधीर शास्त्री प्रतिभेबद्दलची कृतज्ञता व्यक्त करताना म्हणतात :

**तू जवळ असलीस की**
**भावनांचे शब्द होतात**
**अन् शब्दांच्या कविता**
**तू, तू म्हणजे माझी प्रतिभा**

एका अर्थाने कवी सुधीर शास्त्री यांनी आपल्या कवितेची निर्मिती प्रक्रियाच सहज सोप्या शालीनतेने व्यक्त केली आहे. 'भावनांचे शब्द होतात' या संवादी सुरात 'अरूपाचे रुप दाखवणारी' ती सृजनशक्तीच आपली सहचरी आहे हे स्पष्ट होते.

कवी सुधीर शास्त्री जीवनातील विविध रूप-रंगाचा, नाद-लयीचा आनंद घेतात, नि तो कवितेतून साकारही करतात. विशेष म्हणजे निमंत्रण देणाऱ्या अनेक सुखवर्षावालाही सुशीतल अशा संयमाच्या रेषांनी आपली अभिव्यक्ती ते शालीन करतात- 'कुंपण'मधील पुढील ओळी पहा-

**तो काठ नदीचा होता**
**प्राजक्तही बहरला होता**
**आतून सारंऽऽ दाटून आलं**
**मी फुलं वेचणार...,**
**इतक्यात, कुंपण 'नाही' म्हणालं!**

हे कुंपण अरूप आहे, संयमाचे संस्कारांचे आहे. कितीतरी क्षण माणसाच्या आयुष्यात असे येतात, जेथे आंतल्या जागरूक 'स्व'शिवाय कुणीच साक्षी नसते; पण त्यामुळे नदीचा निसरडा घाटही सजग विवेकाने पार करता येतो. मांगल्याचा प्राजक्त अम्लान राहतो.

प्रीती भावनेच्या अनेकविध भावच्छटा प्रचलित प्रतिमांच्या सोबतीने भावगीतात्मक रूपबंधाने व्यक्त होताना दिसतात. कधी विरहिणी, कधी मुक्तछंदात्मक रुपडे घेऊन प्रीतीचे सप्तरंगी विश्व कवी सुधीर शास्त्री त्यांच्या 'माणूस' या काव्यसंग्रहातून अनेक ठिकाणी साकार करतात. काही तरल व रेशमी शब्दावलीतून याचा प्रत्यय देण्याचा प्रयत्न करीत आहे. 'हे बंध रेशमाचे' मधून उत्कट अनुनयाचा भावपूर्ण प्रत्यय येतो. उदा.-

**हे पाहा आकाश माझे**
**आले मेघही भरून**
**वर्षूनी ह्या मेघधारा**
**चिंब दोघां न्हाऊ दे!**

किंवा

**येऊ नकोस तू**
**या अशा कातरवेळी**
**कृष्णास भेटूनी बघ**
**राधा सावळी झाली!**

यातून उत्कट प्रीतीचे अद्धैत तर आहेच, शिवाय, त्याला अशरीरी ओढीचा वैश्विक प्रत्ययही आहे. प्रीतीप्रमाणेच कवी सुधीर शास्त्री यांनी निसर्गाचीही वेगळी अशी विलोभनीय रूपे चितारलेली दिसतात. ज्यातून निसर्ग व त्यातून प्रकटणारे त्या क्षणीचे भावतरंग रसिकाला प्रत्ययास येतात. काही उदाहरणे अतिशय बोलकी आहेत-

'पाऊस : एक अनुभव' मध्ये कवी सुधीर शास्त्री यांना एकाच पावसाची अनेक रुपे जाणवतात-

**पाऊस म्हणजे**
**व्याकूळ मन**
**आठवणीत रमलेले**
**पाऊस म्हणजे**
**काळे घन**
**शुभ्र मोती भरलेले!**

किंवा

**'प्रीती'मधून-**

**चांदणी ही रात्र सखे**
**चंद्रही भरात असे**
**मंद ही हवा आज**
**धुंद हा गंध असे!**

किंवा

**'तू-मी' ह्या काव्यातून-**

**'तू' चांदरात मंतरलेली**
**'मी' अवसेची रात्र काळी**

**त्यातच पुढे-**

**'तू' श्रावणसर ओलावा**
**'मी' तप्त वैशाख वणवा**

अशा परस्परविरोधी निसर्ग प्रतिमांतून मानसरंग व्यक्त होतात. 'माणूस' या काव्यसंग्रहातून आत्मचिंतनपर वाटाव्या अशा जीवनविषयक कवितांचाही समावेश

आहे. त्या कधी आत्मसंवादी आहेत तर कधी नियतीचे आघात नाट्य अनुभवल्यानंतर सर्वशक्तिमान जगन्नियंत्यालाच प्रश्न विचारणाऱ्या आहेत- 'कधी नाही' ही अशीच जीवनाच्या सांज 'उतारावर' आलेली विफलता व्यक्त करणारी कविता आहे. जीवनात जेव्हा संधी होती, तेव्हा 'जागेपण' नव्हते, 'माणूस' म्हणून जन्माला येऊनही 'माणूस' म्हणून जगलोच नाही, ही तीव्र जाणीव 'कधी नाही'तून ओवीच्या लयीत, धिम्या सौम्य निरांजनीसारखी अंतर्मुख करते. वानगीदाखल काही ओळी पाहा-

**कधी नाही धरली**
**आंधळ्याची काठी**
**कधी नाही भरली**
**ओंजळ रीती!**
**कधी नाही लावला**
**कपाळी टिळा**
**कधी नाही पाहिला**
**विठ्ठल सावळा!**

पंचसंवेदनाचे देणे लाभूनही जीवनाचे सार्थक केलेच नाही ही भावना वाचकांना अंतर्मुख करणारी आहे. तसेच 'भीष्म'मधील सामाजिक शोषणाचे चिंतन वास्तवाचे नेमके दर्शन घडवते-

**कुठे आहे एकलव्य**
**द्रोण त्याला शोधीत आहे!**
**डाव मांडून बसले कौरव**
**पांडवांची त्यांना आस आहे!**

वर्तमानाचे शोषणचक्र, नीतिमूल्यांचा ऱ्हास नि भविष्याची आस मांडणारी अशी चिंतनशील कविता 'माणूस' या संग्रहात कवी सुधीर शास्त्री यांनी अभिव्यक्त केली आहे.

'आई' सारखी भावोत्कट कविता मांगल्याचे, वात्सल्याच्या अनुबंधाचे उत्कट चित्रण करते. 'आई' ह्या चिरंतन सुमंगल नात्याचे वर्णन करतांना कवी सुधीर भावपूर्ण शब्दात किती मन:स्पर्शी लिहितात पाहा :

**समईची मंद तेवणारी**
**ज्योत असते आई!**
**देवा तुझ्या मूर्तीतही**
**दिसते मला आई!**

किंवा

**पुढील ओळीत तर –**

**आयुष्याच्या प्रत्येक वळणावर**
**सोबत करते आई**
**माझ्या प्रत्येक श्वासामध्ये**
**असते माझी आई!**

असे वात्सल्य भावनेचे शिखर गाठले आहे. 'आधार' कवितेचे चिंतन स्वावलंबित्वाचा आग्रह करणारे आहे. 'एकटा'मधील अटळ एकाकीपण नियतीचे संकेत देणारे आहे. 'जीवनाष्टक' मधून सरस्वतीच्या उपासनेचा मंत्र देणारे आहे. 'एकांताने विचारले' मध्ये 'स्व' पुढे जाण्याची अशक्यता दाखवणारी घुसमट आहे.

**एकांताने विचारले लाख प्रश्न मजला**
**याचसाठी टाळत होतो मी एकांताला**

यासारख्या आशयघन ओळी आंतरिक संघर्षाचे प्रखर दर्शन घडवतात. 'पुरे झाले देवा आता–!' सारख्या बालकवितेतून मधल्या अप्रिय काळातील बालमनाची तगमग आहे. 'व्यथा'मधून दांभिकांमध्ये वावरताना संवेदनशील मनाची जी घुसमट होते, त्याचे प्रत्ययकारी चित्रण आहे. जीवनानुभूतीचे असे नाना तरंग व्यक्त करीत कवी सुधीर शास्त्री यांची संवेदना शब्दरूप होते. 'माणूस' या त्यांच्या पहिल्याच काव्यसंग्रहातून जाणवणारे त्यांच्या अभिव्यक्तीचे पहिले दर्शन नंतरच्या त्यांच्या लेखनकृतीबद्दल अपेक्षा वाढवणारे आहे.

अशी विविध भावभावनांचा वेध घेत मनात घर करणारी 'माणूस' ह्या कवितासंग्रहातील कविता ही बदलत जाणाऱ्या माणूसपणाचा परखड वेध घेते. ह्या संग्रहातील माणूस कवितेत कवी श्री.सुधीर शास्त्रीनी 'माणूस' ह्या शिर्षक कवितेतून मुळारंभी देवटाक्यातील नितळ जळासारखा असणारा माणूस व्यवहारी तगमगीत कसा गढूळ होत जातो, याचे चिंतन संवादी शैलीत व्यक्त केले आहे. जन्मजात

तरलता हरवून अहंकार, भेदभाव, चलाखी यांनी माणूस कसा आपला चेहरा गमावून बसतो, याचे मनन कवीने अंतर्मुख होऊन केले आहे. जीवनदृष्टी देणाऱ्या 'माणूस'मधील कविता रसिकांना निश्चितच चिंतन प्रवृत्त करतील.

प्रशासकीय सेवेत आपले मानसिक व बौद्धिक व्यतीत करताना संवेदनेचे हळुवार मोरपीस जपणे, हीच एक विलक्षण साधना आहे. श्री.सुधीर शास्त्री ती साधना मनोभावे करीत आहेत. त्यांच्या ह्या साधनेला व पुढील निर्मितीला हार्दिक शुभेच्छा! व 'माणूस' या पहिल्याच काव्यसंग्रहाच्या प्रकाशनानिमित्ताने हार्दिक शुभेच्छा!

**प्रवीण दवणे**
**ब/३०३/राजहंस, लुईसवाडी**
**ठाणे (पश्चिम) ४०० ६०४**
**मो.९८२०३८९४१४**

# मनोगत

## ‘माणूस’पण रुजतांना...

**रसिकहो नमस्कार,**

‘‘माणूस’’ हा माझा पहिला काव्यसंग्रह रसिक वाचकांच्या हाती सोपवितांना मला अतीव आनंद होत आहे.

हा माझा पहिलाच काव्यसंग्रह प्रसिद्ध झाल्याचा मला जेवढा आनंद होत आहे, त्यापेक्षा जास्त आनंदी होणारे असे माझ्या जवळचे अनेक मित्र व आप्तस्वकीय आहेत.

कविता केव्हा रुजते, ती कधी सुचते व कोठे भेटते खरं तर हे एक कोडंच आहे. कॉलेजमध्ये असतांना दोन-चार ओळी सुचायच्या व नामवंत कवींच्या नावे त्या मी मित्रांना ऐकवायचो व त्यांनाही त्या आवडायच्या, या ओळी एखाद्या वेगळ्या डायरीत लिहण्याचं त्या वेळी राहून गेलं अन् पुस्तकांवर, नोट्सवर लिहिलेल्या या ओळी कालांतराने रद्दीत गेल्या, खरं तर आज त्याची खंत वाटते, पण असो, प्रत्येक कविता आपलं नशीब घेऊन येत असावी.

मी एकदा प्रवासात असताना रामदास फुटाणे सरांच्या कवितेतील ‘आपण सारे भाऊ-भाऊ, सारा देश वाटून खाऊ’ या ओळी कानावर पडल्या व मन अस्वस्थ

झालं, प्रवासात त्याच ओळी सारख्या मनात घोळत होत्या व त्यांनतर पुण्याला पोहचल्यावर एक कागद घेऊन न थांबता सुचेल ते लिहून काढलं, ती माझी पूर्ण रुपातील पहिली कविता ‘भीष्म’ यानंतर मग लिहिण्याची सवय जडली व कविता मला नित्यनेमाने भेटतच राहिली.

जीवनातल्या चढउतारावर मध्येच काहीतरी बिनसलं अन् मग बरेच वर्षे कविता माझ्यावर रुसली. पण ती पुन्हा भेटली, अगदी नव्याने, जणू काही सात जन्माचं नांत असल्यासारखी.

माझा हा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला म्हणजे मी ‘कवी’ वगैरे झालो असा माझा अजिबात समज नाही, आयुष्याचे कडू-गोड अनुभव, आपल्या सभोवताली घडणाऱ्या घडामोडी, सामाजिक परिस्थिती शब्दबद्ध करण्याचा हा एक छोटासा प्रयत्न आहे. माझ्या या काव्यसंग्रहात मी प्रेम-विरह, सुख-दु:ख, आचार-विचार, निसर्ग-पर्यावरण, सामाजिक स्थिती-व्यवहार, इ. दैनंदिन आयुष्यातील अनेक गोष्टींना स्पर्श करण्याचा प्रयत्न केला आहे.

काव्यसंग्रह प्रकाशित करणे हे वाटते तितके सोपे काम नाही व ते किती जिकिरीचे आहे हे सुरुवात केल्यावरच कळते, पण जवळचे अनेक मित्र व हितचिंतकांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्यामुळेच हा काव्यसंग्रह मला आपल्यापर्यंत पोहचविता आला, त्याबद्दल मी त्या सर्वांचा मनापासून ऋणी आहे.

हा काव्यसंग्रह साकारत असतांना मला आदरणीय ज्येष्ठ कवी, गीतकार साहित्यिक व विचारवंत श्री.प्रवीण दवणे सरांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले, त्यांनी अतिशय तळमळीने, आत्मीयतेने व आपुलकीने मला वेळोवळी मार्गदर्शन केले, यासाठी मी त्यांचे आभार न मानता सदैव त्यांच्या ऋणात राहणेच पसंत करेन.

हा काव्यसंग्रह अचूक व निर्दोष व्हावा म्हणून मुद्रित तपासणीचे काम श्रीम. उमाताई नाबर यांनी अतिशय काटेकोरपणे केले, याबद्दल मी त्यांचा मनापासून आभारी आहे. या काव्यसंग्रहाच्या टंकलेखनाचे व अक्षर जुळवणीचे काम श्री.जीवन सुतार व श्री.किशोर पोतदार यांनी अचूकपणे केले याबद्दल मी त्यांचेदेखील आभार मानतो.

या काव्यसंग्रहाचे आकर्षक मुखपृष्ठ व कवितांना साजेशी चित्रे काढण्याचं काम श्री.नितीन निगडे यांनी अतिशय चोखपणे पार पाडले आहे, त्याबद्दल मी त्यांचा

आभारी आहे.

अनघा प्रकाशनचे श्री.अमोल नाले यांची या पुस्तक प्रकाशनाच्या अनुषंगाने माझी पहिल्यांदाच भेट झाली व पहिल्याच भेटीत हा काव्यसंग्रह उत्कृष्ट व देखणा होईल याबद्दल त्यांनी मला आश्वस्त केले व त्याप्रमाणे त्यांनी हा काव्यसंग्रह अतिशय सुरेख पद्धतीने तयार करून प्रकाशित केला त्याबद्दल मी त्यांचा देखील आभारी आहे.

आणि सर्वात शवेटी पण अतिशय महत्त्वाचे म्हणजे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ यांनी 'नवलेखक अनुदान योजनेंतर्गत' माझ्या काव्यसंग्रहाची निवड करून तो प्रकाशित केला, यासाठी मी मा.परीक्षक व मंडळाचे सन्मानीय अधिकारी तसेच महाराष्ट्र शासनाचे विनम्रपणे आभार मानतो.

या काव्यसंग्रहातील कविता वाचकांना भावतील व त्यांच्या जगण्याच्या प्रवासात सदैव साथ करतील अशी मला आशा आहे या अपेक्षेसह ''माणूस'' हा माझा पहिला काव्यसंग्रह मी रसिकांना सुपुर्द करतो.

मुंबई, दि. २६/०१/२०२४

**सुधीर पंडितराव शास्त्री**
९८६७११४१०१
sudhirpshastri@gmail.com

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | कवितेचे नांव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | माणूस | १९ |
| २. | तू | २० |
| ३. | कुंपण | २१ |
| ४. | प्रीती | २२ |
| ५. | हे बंध रेशमाचे | २३ |
| ६. | पाऊस : एक अनुभव | २४ |
| ७. | आज अचानक | २५ |
| ८. | ‘तू’ – ‘मी’ | २६ |
| ९. | कधी नाही... | २७ |
| १०. | ही तुझी दुनिया | २८ |
| ११. | भीष्म | ३० |
| १२. | सुख | ३१ |
| १३. | एकांत | ३२ |
| १४. | आई | ३३ |
| १५. | मीच जन्मलो माझ्या पोटी | ३४ |
| १६. | आज पुन्हा | ३५ |
| १७. | दु:ख | ३६ |

| अ.क्र. | कवितेचे नांव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १८. | व्यथा | ३८ |
| १९. | कधी -कधी | ३९ |
| २०. | सलाम | ४० |
| २१. | पुरे झालं देवा आता | ४२ |
| २२. | ओढ | ४४ |
| २३. | एक पाऊस मनातला | ४५ |
| २४. | सुगंधी रुमाल | ४६ |
| २५. | दिशा वेगळ्या... | ४७ |
| २६. | कशाला | ४८ |
| २७. | मी | ४९ |
| २८. | सवय | ५० |
| २९. | पहिला पाऊस | ५१ |
| ३०. | बाजार | ५२ |
| ३१. | तूच | ५४ |
| ३२. | आयुष्य | ५५ |
| ३३. | बोभाटा | ५६ |
| ३४. | क्षण एक सौख्याचा | ५७ |
| ३५. | मृगजळ | ५८ |
| ३६. | सखे | ५९ |
| ३७. | नशीब | ६० |
| ३८. | आजकाल | ६२ |
| ३९. | गुलमोहर | ६३ |

| अ.क्र. | कवितेचे नांव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ४०. | बाप | ६४ |
| ४१ | पाऊस आणि मी | ६६ |
| ४२. | प्रेम | ६७ |
| ४३. | आयुष्याचं गणित | ६८ |
| ४४. | शब्दार्थ | ६९ |
| ४५. | जगता आलं पाहिजे | ७० |
| ४६. | प्रश्न | ७१ |
| ४७. | एकांताने विचारले... | ७२ |
| ४८. | खड्डे | ७३ |
| ४९. | एक अनामिक हुरहुर | ७४ |
| ५०. | पोतराज | ७५ |
| ५१. | पाऊस : अक्राळविक्राळ | ७६ |
| ५२. | आनंदाचे तळे | ७७ |
| ५३. | जीवनाष्टक | ७८ |
| ५४. | कविता | ८० |
| ५५. | आजार | ८१ |
| ५६. | बालपणीचा पाऊस | ८२ |
| ५७. | मिलन | ८४ |
| ५८ | मुखवटे | ८५ |
| ५९. | साक्ष | ८६ |
| ६०. | शब्दांचे खेळ | ८७ |
| ६१. | मधुमास | ८८ |

| अ.क्र. | कवितेचे नांव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ६२. | वेळ | ८९ |
| ६३. | जिंदगी | ९० |
| ६४. | सोबत | ९१ |
| ६५. | पाऊस | ९२ |
| ६६. | सांगावा | ९३ |
| ६७. | भग्न अवशेष | ९४ |
| ६८. | वतनदारी | ९५ |
| ६९. | डाव | ९६ |
| ७०. | मला नाही... | ९७ |
| ७१. | आधार | ९८ |
| ७२. | तुझ्यासाठी एक कविता जपून ठेवलीय... | ९९ |
| ७३. | आजकाल कवीला काहीच सुचत नाही | १०० |
| ७४. | जगण्याचा उत्सव व्हावा | १०२ |
| ७५. | स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव | १०३ |
| ७६. | माझी कविता | १०४ |
| ७७. | एकटा | १०५ |
| ७८. | शोध देवाचा | १०६ |
| ७९. | शिक्षा | १०८ |
| ८०. | लढाई | १०९ |
| ८१. | कुठे तरी दूर देशी | ११० |
| ८२. | पुन्हा भेटूच आपण | ११२ |




# १. माणूस

जन्मलो तेव्हा
अगदी शुद्ध होतो मी
देवटाक्याच्या पाण्यासारखा



मग या जगानेच शिकविले
खरे-खोटे बोलायला

इथल्याच शाळेत
गिरवली लोभ, मोह, स्वार्थाची अक्षरे

पुढे पुढे जातिपातींची
जळमटं चिकटत गेली शरीराला...

अहंकाराच्या वाऱ्याने
सुखावू लागले व्याकूळ मन

अन् एवढं सगळं झाल्यावर
मला ओळख मिळाली
माणूस म्हणून...

मला ओळख मिळाली
माणूस म्हणून.

# २. तू

तू जवळ असलीस की,
भावनांचे शब्द होतात
अन् शब्दांच्या कविता...



तू जवळ असलीस की,
अलगद झुळूक येते वाऱ्याची
अन् नाजूक फुलपाखरू
स्पर्शून जाते शरीरा...

तू जवळ असलीस की,
आभाळ ढगांनी भरून येते
अन् मोर नाचू लागतो
फुलवून मोहक पिसारा...

तू जवळ असलीस की,
बरसतात श्रावणसरी
अन् मृद्गंधाने
दरवळतो आसमंत सारा...

तू जवळ असलीस की,
सूर्याची कोवळी किरणे
पसरतात आपले बाहू
अन् आभाळात उडतो
सप्तरंगाचा फवारा...

तू जवळ असलीस की,
हरवून जातो मीही
किती सावरू स्वत:ला
अन् कसा आवरू हा
शब्द पसारा...

तू जवळ असलीस की,
भावनांचे शब्द होतात
अन् शब्दांच्या कविता
तू, तू म्हणजे माझी 'प्रतिभा.'

# ३. कुंपण

तू तिथे होती
मीही तिथे होतो
सगळं कसं व्यवस्थित जुळून आलं...
मी काही बोलणार
इतक्यात, कुंपण नाही म्हणालं

ती वाट वळणदार होती
ते क्षण निसरडे होते
आभाळ सारंऽऽ ढगांनी भरून आलं...
मी पाऊल उचलणार
इतक्यात, कुंपण नाही म्हणालं

तो काठ नदीचा होता
प्राजक्तही बहरला होता
आतून सारंऽऽ दाटून आलं...
मी फुलं वेचणार
इतक्यात, कुंपण नाही म्हणालं



ती सकाळ सुगंधी होती
ती रात्र गंधाळलेली होती
मन सारंऽऽ सुगंधाने दरवळून आलं...
मी जरासा शहारणार
इतक्यात, कुंपण नाही म्हणालं.

# ४. प्रीती



चांदणी ही रात्र सखे
चंद्रही भरात असे
मंद ही हवा आज
धुंद हा गंध असे

रम्य किती विश्व हे
स्वप्न की सत्य हे
दूर तू उभी का
हात हा हाती दे

धन्य हा क्षण आज
साथ ही तुझी असे
कृष्ण-राधा, राम-सीता
कोण मी अन् कोण तू
प्रश्न हा गौण असे
आज राणी एक प्रीती
दोन हृदयी वसे.

# ५. हे बंध रेशमाचे



हे बंध रेशमाचे
रेशमीच राहू दे
स्वप्नातल्या कळ्यांची
ही पाकळी फुलू दे

हे पाहा आकाश माझे
आले मेघही भरून
वर्षूनी ह्या मेघधारा
चिंब दोघां न्हाऊ दे

गारवा गोड हवेचा
मोहूनी टाके मनाला
होऊनी धुंद आज
तुला कवेत घेऊ दे

जाई-जुई प्राजक्त
चाफा गुलाब मोगरा
आज तुझ्या श्वासातूनी
सारे सुगंध दरवळू दे

आला वसंत आला
आले बहरून सारे
ही भेट दोन जिवांची
नवपालवी फुटू दे

हे बंध रेशमाचे
रेशमीच राहू दे
स्वप्नातल्या कळ्यांची
ही पाकळी फुलू दे
स्वप्नातल्या कळ्यांची
ही पाकळी फुलू दे.

# ६. पाऊस : एक अनुभव



पाऊस म्हणजे
एक आठवण
ओलीचिंब भिजलेली
पाऊस म्हणजे
नवी नवरी
हिरवा शालू नेसलेली

पाऊस म्हणजे
व्याकूळ मन
आठवणीत रमलेले
पाऊस म्हणजे
काळे घन
शुभ्र मोती भरलेले

पाऊस म्हणजे
सुरेल गाणी
मधुर स्वरांनी भारलेली
पाऊस म्हणजे
एक हुरहुर
मनात खोल रुतलेली

पाऊस म्हणजे
मंतरलेले दिवस
इंद्रधनुने रंगलेले
पाऊस म्हणजे
हिरवे स्वप्न
पानाफुलांनी सजलेले

पाऊस म्हणजे
चातक पक्षी
अमृतथेंब प्यालेला
पाऊस म्हणजे
एक अनुभव
रोमारोमांत भरलेला
पाऊस म्हणजे
एक अनुभव
रोमारोमांत भरलेला!

# ७. आज अचानक



असे काय दु:ख
तू लपविलेस कोठे
आज अचानक कसे
हसू तुझ्या ओठी फुटे

कशा दाबल्या वेदना
खोल अंतरात
कशी रोखली ती
अश्रूंची वरात
कोमल तुझ्या पायाला
किती आज रुतती काटे

आज अचानक कसे
हसू तुझ्या ओठी फुटे

किती वार पुन्हा
सोसलेस तू
कशा जगापासून जखमा
लपविल्यास तू
मधुर तुझा कंठ हा
का असा दाटे

आज अचानक कसे
हसू तुझ्या ओठी फुटे

काय लपवितेस
रेषा हातावरच्या
त्यामुळे का भाग्य
कुणाचे लपे
दे मोकळी करून
वाट आसवांना
ते बिचारे
जाणार कोठे

आज अचानक कसे
हसू तुझ्या ओठी फुटे.

# ८. 'तू' - 'मी'



'तू' चांदरात मंतरलेली,
'मी' अवसेची रात्र काळी ।

'तू' राणी सप्तुसरांची,
'मी' उदास उदास गाणी ।

'तू' वेल जुईची लडिवाळ,
'मी' उजाड निर्जन माळ ।

'तू' श्रावणसर ओलावा,
'मी' तप्त वैशाख वणवा ।

'तू' लाट स्वैर सागरी,
'मी' खडक उभा किनारी
मी खडक उभा किनारी ।

# १. कधी नाही...



कधी नाही धरली
आंधळ्याची काठी
कधी नाही भरली
ओंजळ रिती

कधी नाही आले
आभाळ दाटून
कधी नाही वेडे
शहारले मन

कधी नाही लागला
सुरेल सूर
कधी नाही गायला
मधुर मल्हार

कधी नाही लावला
कपाळी टिळा
कधी नाही पाहिला
विठ्ठल सावळा

कधी नाही जगलो
माणूस म्हणून
व्यर्थ मी जन्मलो
माणूस म्हणून !

# १०. ही तुझी दुनिया

आता हे मन कुठेच रमत नाही
ही तुझी दुनिया, इथली माणसं
माझं त्यांच्याशी जमत नाही

येथे अन्यायालाच न्याय म्हणतात
अन् त्यासाठी मग हे
एकमेकांची डोकी फोडतात
म्हणून तर आता कोणी
तुझ्याकडे दाद मागत नाही



ही तुझी दुनिया, इथली माणसं
माझं त्यांच्याशी जमत नाही

येथे प्रेमाचा देखील बाजार भरतो
अन् खरा प्रेमी गुदमरून मरतो
राम एकटाच जातो वनात...
आता सीता सोबत येत नाही

ही तुझी दुनिया, इथली माणसं
माझं त्यांच्याशी जमत नाही

प्रत्येकजण दुसऱ्याचा विश्वासघात करतो
भाऊ भावाचा वैरी होतो
अन् बाप मुलीवर बलात्कार करतो
खूप झालीत माणसं येथे
आता आणखी दानवांची गरज नाही

ही तुझी दुनिया, इथली माणसं
माझं त्यांच्याशी जमत नाही

साऱ्यांचेच हात येथे बरबटलेले असतात
तरी देखील ते दुसऱ्यांना दोष देतात
कितीही केली पापं तरी
त्यांचा घडा भरत नाही

ही तुझी दुनिया, इथली माणसं
माझं त्यांच्याशी जमत नाही

खूप दमलो आता...
हे सारं पाहवत नाही
श्वास रोखून बसलो मी
पण तुझं बोलावणं येत नाही

आता हे मन कुठेच रमत नाही
ही तुझी दुनिया, इथली माणसं
माझं त्यांच्याशी जमत नाही.

# ११. भीष्म

रोज लुटतात येथे द्रौपदी
कृष्ण मात्र गायब आहे;
गल्लीपासून दिल्लीपर्यंत
सारा कौरवांचा दरबार आहे!

राम शोधता सापडेना
सीता मात्र त्यजते आहे;
कोण होईल कर्ण आता
कवचकुंडले मागणारे
इंद्र येथे खूप आहे!

कुठे आहे एकलव्य
द्रोण त्याला शोधीत आहे;
डाव मांडून बसले कौरव
पांडवांची त्यांना आस आहे!

काय फाडता छाती कुणाची
राम का त्यात दिसणार आहे?
माणसांच्या गर्दीत या;
माणुसकी मी शोधीत आहे!

कधी येतील टिळक शिवाजी
आज त्यांचीच येथे वाण आहे;
काय लिहितील व्यास वाल्मिकी
''मेरा भारत महान आहे?''



कसा आहे देश माझा...?
कसे हे लोक आहे...?
भीष्म होऊनी पाहतो सारे
हा माझाही मग दोष आहे.

# १२.सुख

देव केले, धर्म केले
जप तप मंत्र झाले
सारं काही करून पाहिलं...
सुख-सुख म्हणतात ज्याला
तेवढच एक भोगायचं राहिलं



नोकरी केली, चाकरी केली
कष्टाची भाकरी खाल्ली
आडवाटेचा मोह सोडून
सरळ मार्गावर चालत राहिलं...
सुख-सुख म्हणतात ज्याला
तेवढच एक भोगायचं राहिलं

चोरी नाही डाका नाही
पाठीत कुणाच्या सुरा नाही
खोट्या बेगडी दुनियेचा मोह सोडून
गाणं सत्याचं गायलं...
सुख-सुख म्हणतात ज्याला
तेवढच एक भोगायचं राहिलं

पुसून पाहिल्या तळहातावरच्या रेषा
घासून पाहिल्या ललाटरेखा
ज्योतिषाला टाळून
लक्ष कर्मावर ठेवलं...
सुख-सुख म्हणतात ज्याला
तेवढच एक भोगायचं राहिलं.

# १३. एकांत

तूही शांत, मीही शांत
चल सखे अनुभवू, थोडासा एकांत

जगण्याचे ओझे, ठेवू जरा खाली
स्वप्नांच्या झोपाळ्यावर झुलूया वरखाली
बघ उघडून डोळे जरा
हा तुझा आसमंत, हा माझा आसमंत
चल सखे अनुभवू थोडासा एकांत

किती ठेवतेस हिशोब, माझ्या भले-बुरे वागण्याचा
किती वाचतेस पाढा, माझ्या चुकल्या क्षणांचा
डोंगर दु:खाचे केले
मीही पादाक्रांत, तूही पादाक्रांत
चल सखे अनुभवू थोडासा एकांत

थकले श्वास आता, उरले क्षण थोडे
तुझ्या माझ्या जगण्याचे अडले कोठे घोडे
हाती हात घेऊन चल
तूही निवांत, मीही निवांत
चल सखे अनुभवू थोडासा एकांत.



# १४. आई



कधीही जाऊन सावलीत बसावं
अशी असते आई
न सांगताच, सारं कळतं
अशी असते आई...

आकाशात उंच उडणाऱ्या पाखराचे
पंख असते आई
खोलवर रुजलेल्या संस्काराचे
मूळ असते आई...

समईची मंद तेवणारी
ज्योत असते आई
देवा तुझ्या मूर्तीतही
दिसते मला आई...

आयुष्याच्या प्रत्येक वळणावर
सोबत करते आई
माझ्या प्रत्येक श्वासामध्ये
असते माझी आई...

माझ्या प्रत्येक श्वासामध्ये
असते माझी आई.

# १५. मीच जन्मलो माझ्या पोटी



मीच जन्मलो माझ्या पोटी
माझ्या संगे खेळाया
माझे हसणे, माझे रडणे
माझ्या नयनी पाहाया

मीच मारतो मला मिठी
नाजूक प्रेमळ हाताने
तेव्हा येई सागर भरती
चंद्रही हसतो प्रेमाने

मी रुसता मजवरती
काळोखाची रात्रच की ती
किती कराव्या युक्त्या मग
मी मलाच हसविण्यासाठी

मीच खेळतो माझ्यासवे
हाथ धरूनी जोमाने
माझ्यातून मी सरतो क्षण क्षण
अन् मलाच भरतो कणाकणाने.

# १६. आज पुन्हा...

आज पुन्हा मला
सुखाची आठवण आली
आज पुन्हा मनाला
जखम नवी झाली

आज पुन्हा एक
शेतकरी कर्जबाजारी झाला
आज पुन्हा एका
माउलीची कूस वांझ झाली

आज पुन्हा बापानेच
घोटला गळा तिचा
आज पुन्हा एक
कळी गर्भातच मेली

आज पुन्हा प्रेत
सरणावर उठून बसले
आज पुन्हा जगाला
माझी आठवण झाली

आज पुन्हा काही
बोलावेसे वाटले
आज पुन्हा एक
गझल उमलुनी आली.



# १७. दु:ख

दु:ख असते मलाही
दु:ख तुलाही असते
दु:खाला कोठे काळ वेळ
दु:ख कधीही कसेही येते

दु:ख आकाशातून येते
अचानक कडाडलेल्या विजेसारखे
आपले-आपले म्हणतो ज्यांना आपण
तेही होतात नेमके याच वेळी परके

मग आपणच सोसायचा सारा अंगार
आपले दु:ख असते आपलाच भार

दु:ख सलत राहते
पायात रुतल्या काट्यासारखे
कितीही घातली समजूत मनाची
तरीही डोळे बोलतात, जे बोलायचे

कधी कधी महापूरच येतो दु:खाचा
वाहत जातो सैरावैरा
सगळं, सगळं बुडून जातं
पण, आपण गाठतो किनारा



दु:ख येतं वादळासारखं
गोल गोल वेगाने फिरून
घोंगावतो सोसाट्याचा वारा
अशाच वेळी राहावे उभे घट्ट पाय रोवून

दु:ख येतं आपल्याच आतून, खूप आतून
निळंशार आभाळ जस येतं काळ्याभोर ढगांनी दाटून
खोलवर घट्ट रुतलेली मुळं
मग साथ सोडू लागतात जमिनीची
एवढ्यात दूरवर दिसतो एक किरण आशेचा
आणि सारा काळोख सारून
उगवतो सूर्य पूर्वेचा...
उगवतो सूर्य पूर्वेचा.



# १८. व्यथा

मी सांगितली व्यथा माझी जेव्हा
मैफलीत ते हसत होते
रुतला पायात काटा माझ्या
ते प्राजक्तात तेव्हा न्हात होते



गळ्यात बांधला माझ्या
त्यांनी पट्टा लाचारीचा
हार शोभिवंत फुलांचे
त्यांच्या गळ्यात होते

वाकली मान माझी
त्यांच्याच ओझ्याने
ते (मात्र) ताठ मानेने
रस्त्यावरी फिरत होते

केली बंद दारे त्यांनी
मला चारही दिशांची
त्यांच्या मुठीत माझे
श्वास कोंडले होते

मी सांगितली व्यथा माझी जेव्हा
मैफलीत ते हसत होते
रुतला पायात काटा माझ्या
ते प्राजक्तात तेव्हा न्हात होते.

# १९. कधी-कधी



कधी कधी सुचते काही-बाही
कधी कधी काहीच सुचत नाही

कधी कधी पडतो लख्ख प्रकाश
कधी कधी दाटून येते धुके
आणि समोरचेही दिसत नाही

कधी कधी अलगद झुळूक येते वाऱ्याची
कधी कधी गुदमरून जातो जीव
आणि पान झाडाचेही हलत नाही

कधी कधी आकाश ताऱ्यांनी भरून येतं
कधी कधी दाटत जातो काळोख
आणि वाट पायाखालचीही दिसत नाही

कधी कधी जुळून येतात सुरेल सूर
कधी कधी बेरंग होते मैफल
आणि आपलेही आपल्या सोबत राहत नाही

कधी कधी अचानक हसू येतं ओठांवर
कधी कधी पिळवटून जातो जीव
आणि तरीही डोळे पाणावत नाही

कधी कधी एका क्षणाने सार्थक होते जगण्याचे
कधी कधी सारे आयुष्य संपून जाते
आणि तरीही कारण जगण्याचे कळत नाही.

## २०. सलाम



माणसा, तुझ्या जिद्दीला सलाम!
तुझ्या इच्छाशक्तीला सलाम!

कोण जाणे कशी ही
करोनाची लाट आली
पाहता पाहता त्याने
सारी पृथ्वीच व्यापली

सगळीकडे हाहाकार झाला
कळलेच नाही कोण कधी गेला
आम्ही फक्त मोजदात केली...
पण तू लढत राहिला
हार नाही मानली

सोन्यासारखी माणसं
डोळ्यादेखत गेली
भरल्या संसाराची
राखरांगोळी झाली
वर्ष सारं निघून गेलं
मग कसला दसरा
अन् कसली दिवाळी...
पण तू लढत राहिला
हार नाही मानली

आता सारं संपेल असं होतं वाटलं
आभाळ सारं धुक्याने दाटलं
या काळ्याकुट्ट अंधारात
जगण्याची भीती वाटली...
पण तू लढत राहिला
हार नाही मानली
हळूहळू तुझ्या प्रयत्नांना
फळ येऊ लागलं
जगण्यासाठी श्वासांना
बळ येऊ लागलं
तुझ्या यशासाठी
आम्ही फक्त प्रार्थना केली...
पण तू लढत राहिला
हार नाही मानली

सारं काही ठीक होईल
एवढी वाटते आशा
आता तरी बदलेल
आपली ही दशा
याच दिवसाची आम्ही
किती वाट पाहिली...
पण तू लढत राहिला
हार नाही मानली
पण तू लढत राहिला
हार नाही मानली.

(करोना महामारीच्या कठीण परिस्थितीतही हार न मानता निष्ठापूर्वक सेवा बजावलेल्या डॉक्टर, आरोग्य कर्मचारी, पोलिस, सफाई कर्मचारी व वैज्ञानिकांना कृतज्ञतापूर्वक समर्पित.)

# २१. पुरे झालं देवा आता...

पुरे झालं देवा आता
नको अंत पाहू
सांग ना रे किती दिवस
करोनाच्या धाकात राहू



मास्क लावून लावून
कान दुखतात फार
हात धुऊन धुऊन
जीव झाला बेजार
किती दिवस सांग ना रे
मित्रांपासून दूर राहू
पुरे झालं देवा आता
नको अंत पाहू ।।१।।

शाळा नाही, शिक्षक नाही
मन कुठे रमतं...
मित्र नाही, खेळ नाही
एकटं एकटं वाटतं
किती दिवस सांग ना रे
घरात बसून राहू
पुरे झालं देवा आता
नको अंत पाहू ।।२।।

सण आणि उत्सवांचे
वाजलेत तीन तेरा
मौजमजा करण्याचा
विचार नाही खरा
किती दिवस सांग ना रे
असं चौकटीत राहू
पुरे झालं देवा आता
नको अंत पाहू ।।३।।

पहिली, दुसरी, तिसरी
किती या लाटा...
अडवल्या याने साऱ्या
आमच्या या वाटा
किती दिवस सांग ना रे
या लाटा मोजत राहू
पुरे झालं देवा आता
नको अंत पाहू ।।४।।

तुझ्या भेटीलाही
दिवस झालेत खूप
तुझ्या मात्र घराला
भलं मोठं कुलूप
किती दिवस सांग ना रे
दर्शनाची वाट पाहू
पुरे झालं देवा आता
नको अंत पाहू ।।५।।

कोणत्या अशा चुकांची
एवढी मोठी शिक्षा
किती दिवस आता
ही रोजचीच परीक्षा
जाऊ दे ना देवा
सगळं विसरून जाऊ
पुरे झालं देवा आता
नको अंत पाहू
सांग ना रे किती दिवस
करोनाच्या धाकात राहू ।।६।।

# २२. ओढ

कोणती ही ओढ अनावर
क्षणात दूर नेते
हे कोणते ऋणानुबंध
काय असते नाते

कळ ही जीवघेणी कोणती
काळजाचा ठाव घेते
गेलेच वाटते प्राण म्हणता
दान जीवनाचे देते

हे दुःख चिरंतन कोणते
सोसणे असह्य होते
रुतले किती तरीही
साथ जन्माची देते.



# २३. एक पाऊस – मनातला



ढग दाटून आले की
मला भरून येतं

विजांचा कडकडाट झाला की
आठवणींचा गोंगाट होतो

पहिली सर आली की
डोळे ओले होतात

मग कोसळतो तो वेड्यापरी
अन् मी आतून चिंब भिजून जातो

वाहू लागतात पाण्याचे लोंढे
तसा मीही वाहत जातो

आभाळ निरभ्र होते मग
अन् मी पुन्हा चालू लागतो

पाऊस पडून गेला की
आठवणींचा पसारा पांगतो
पावसाच्या थेंबाथेंबात
मग मीच मला शोधत राहतो...
मीच मला शोधत राहतो.

# २४. सुगंधी रुमाल



तू आली नाहीस
तू कधीही येणार नाही
हे पक्कं माहीत असतांनाही...
डोळ्यात प्राण आणून
तुझी वाट पाहत राहिलो
आयुष्यभर...
आणखी कशी असते तपश्चर्या?

❖

तू मुद्दामच विसरून गेली
तुझा सुगंधी रुमाल
मी जपून ठेवावा म्हणून
मी शोधत आलो तुला
तुझा रुमाल देण्यासाठी
आणखी कसा असतो प्रामाणिकपणा?

❖

तू म्हणालीस
कसा आहेस तू
मी उत्तरलो
तुझ्या पुस्तकातील
वाळलेल्या पानासारखा
आणखी किती खरं बोलावं माणसाने?

# २५. दिशा वेगळ्या...



दिशा वेगळ्या, ऋतू वेगळे
कळले आता...
कशास मग पाहसी वळूनी
वळणावरूनी जाता जाता

ओल्या शपथा, हिरवी वचने
विरली आता...
कशास मग हे स्वप्न फुलांचे
खडकावर रुजता रुजता

आठवणींचे पुंजके सारे
विखुरले आता..
कशास त्यांना शोधत बसते
गीत विरहाचे गाता गाता

चेहऱ्यावरती भाव अनामिक
दिसले आता...
कशास मग हे खोटे हसणे
ओळख पटवून देता देता.

# २६. कशाला?

उत्तरे माझी संपली सारी
मग डोळ्यात हे प्रश्न कशाला?

कोसळून गेला कधीच पाऊस
हाती तुझ्या ही छत्री कशाला?

मी नि:शस्त्र रणांगणी धरेवर
अन् तुझ्या करी हे धनुष्य कशाला?

जन्मभरी दिली दूषणे मला
चितेवरी सांत्वनाचे अश्रू कशाला?

जिवंतपणी केला छळ इतका
मेल्यावरी तसबिरीला हे हार कशाला?



# २७. मी



जन्मल्यापासूनच नशिबाशी
लढलो मी...

कोण जाणे कसा सर्वांनाच
नडलो मी...

वसंत आला, बहार आली, निष्पर्ण असा
झडलो मी...

कुणीच केली नाही सांत्वना, काळोखात एकटा
रडलो मी...

जिंकले ते शिरजोर सारे, सभ्यपणे असा
हारलो मी...

मला द्या एक मोकळा श्वास, प्राण जाताना
ओरडलो मी...

# २८. सवय



तू नाही म्हण हवे तर
मला नकाराची सवय झाली

झिडकारलेच आहे जगाने
मला झिडकारण्याची सवय झाली

ढगांनाही मी नको आहेच तसा
मला उन्हाची सवय झाली

हरवले गर्दीत या घर माझे
मला बेघर होण्याची सवय झाली

नको देऊस तू दिलासा जराही
मला दुःख भोगण्याची सवय झाली.

# २१. पहिला पाऊस



आठवतो तुला...?
तो पहिला पाऊस
आभाळ ढगांनी भरून आलेलं
बावरून तू विचारला पत्ता
तो नेमका माझाच होता

आठवतो तुला...?
तो पहिला पाऊस
ती एकटी वाट माझ्या घराकडे जाण्यासाठी
तू दिलीस हाक
हातात घालून हात सोबत चालण्यासाठी

आठवतो तुला...?
तो पहिला पाऊस
ढगांचा गडगडाट, सोसाट्याचा वारा
तू उडवून दिली छत्री
चिंब भिजण्यासाठी

आठवतो तुला...?
तो पहिला पाऊस
आपण चिंब भिजलेलो
विजांचा कडकडाट
तू घट्ट मारलीस मिठी
आयुष्यभर साथ देण्यासाठी.

# ३०. बाजार

हा बाजार कसला आहे,
कोण विकते इथे कुणाला?
मला काहीच उमगले नाही
मी, मजला विकले नाही

हा गोंगाट आहे कशाचा
ही कुणी लावली बोली?
मी काहीच ऐकले नाही
मी, मजला विकले नाही

ती शर्यत होती पळण्याची
ते लावत होते डाव
लाव म्हणाले भाव तुझाही
परी मी काहीच बोललो नाही
मी, मजला विकले नाही

ते चेहरे होते बेगडी, जे गेले विकले
दामही त्यांच्यासाठी हवे तेवढे मोजले
हे गणित कसले, मजला कळले नाही
मी, मजला विकले नाही



पाहुनी माझी ही अवस्था
एका भल्या माणसाने दिला सल्ला
लाव म्हणाले रंग बेगडी
तूही थोडा चेहऱ्याला
हे असे वागणे खोटे
मज कधीच पटले नाही
मी, मजला विकले नाही

दिवस संपला, बाजार उठला
काळोख दाटे चोहीकडे
कोपऱ्यातूनी एक हुंदका
अनामिक मग कानी पडे
जवळ जाऊनी विचारता त्याला
माणुसकी ऐसे सांगे नाव
बोलला, या बाजारात
मला नाहीच मिळाला भाव

खांद्यावर ठेवूनी हात
मी हसत म्हणालो त्याला
मी विकूनी मजला
विकत घेतले तुला
हा पाहून व्यवहार
आनंदून तो म्हणाला
आज माणसाने खरेदी केले माणुसकीला.



# ३१. तूच

तू यावंस माझ्या आयुष्यात
माझ्या जगण्याची प्रेरणा म्हणून
तू असावं सोबत, आयुष्यभर
माझ्या प्रेमाची सावली बनून
तू बरसावं श्रावणसरीसारखं
माझं मन चिंब-चिंब करून...



तू हसावं फुलाफुलांतून
मला बेभान करून
मी जगावं तुझ्यासाठी
तुझा प्रत्येक श्वास होऊन
चालत राहावं तुझ्या सोबत
दु:खं सारी मागे टाकून...

तूच असावं माझं 'आभाळ'
अन् तूच 'पंख' असावे माझे
तुझ्यासवे उंच भरारी
तुझेच विश्व व्यापून.

# ३२. आयुष्य

असंच गेलं आयुष्य...
वादळी वाऱ्यात, रणरणत्या उन्हात
अन् फाटक्या स्वप्नात

असंच गेलं आयुष्य...
खडतर रस्त्यात, अवघड वळणात
अन् ओसाड वाळवंटात

ढग आले, विजा चमकल्या
मी मात्र कोरडाच राहिलो
रिमझिमत्या श्रावणात.



# ३३. बोभाटा

काय माझ्या दु:खाचा
झाला एवढा बोभाटा

चार शेजारी, सगेसोयरे धावून आले
हसतमुखाने केले सांत्वन त्यांनी माझे
क्षणभर ते सुखाने जवळ माझ्या विसावून गेले

धन्य झालो मीही मग
दु:ख माझे त्यांना सुखावून गेले.



# ३४. क्षण एक सौख्याचा



असो दु:ख जन्मभरी...
मागणे एवढेच देवा
क्षण एक सौख्याचा
सुखानेच जावा

तप्त लोहावरी
घाव घणाचे जरी
या दोन घावातील विसाव्यात...
एक झोत हवेचा यावा
क्षण एक सौख्याचा
सुखानेच जावा

ही वाट बिकट किती
अन् संकटे जीवघेणी
या काळोख्या वाटेवर...
एक काजवा चमकावा
क्षण एक सौख्याचा
सुखानेच जावा

असो डोंगर दु:खाचे
की कोसळो पहाड संकटाचे
सावळा तो गिरीधारी...
कृष्ण सखा असावा
क्षण एक सौख्याचा
सुखानेच जावा

आता न साहवे काही
त्राण न राहिले देही
एक आस अंतरी...
शेवटच्या क्षणी श्रीहरी दिसावा
क्षण एक सौख्याचा
सुखानेच जावा.

# ३५. मृगजळ

जगता जगता
एवढे मला कळले होते
मी आलो बराच पुढे
अन् सुख मागे राहिले होते

चाललो घेऊन सूर्य डोईवरी
एकटा मीच माझ्या सवे
आस ज्याची मनाला
ते घर स्वप्नांचे दूर राहिले होते

वाटले पुढे वळणावरी
भेटेल सुख मला
जी दिसली सावली दूरवर
हाय ते मृगजळ होते.



# ३६. सखे



आज कसे
सखे तुला
सारे काही कळे

कसे आज
सखे तुझे
बोलतात डोळे

आज कसे
सखे तुला
मोहरून आले

कसे आज
सखे तुझ्या
अंगी फुलं फुले

आज कसे
सखे तुझे
भय अनामिक गेले

कसे आज
सखे मनी
उंच झोपाळे झुले

असे काय
सखे तुला
अचानक झाले

बदलली चाल
डोळ्यातूनी आज
तुझ्या चांदरात फुले

डोळ्यातूनी आज
तुझ्या चांदरात फुले

# ३७. नशीब

मी आणि माझं नशीब
एकदा बोलत बसलो

एकमेकांना भेटून
कोण किती फसलं
शोधू लागलो...



मी म्हणालो-
मला शांतता हवी होती
तू सारा गोंधळ घातला
तो म्हणाला-
मला रंग हवे होते
तू मात्र फारच
साधाभोळा निघाला

मी म्हणालो-
मला सरळ वाटा आवडतात
आडमार्ग नाही
तो म्हणाला
मला चोररस्ते माहीत होते
पण तुला त्याचं काहीच नाही

मी म्हणालो–
आत एक बाहेर एक
असं बरं वाटत नाही
तो म्हणाला–
कोणत्या युगात आहेस तू
इथे खरं कुणाला पटत नाही

मी म्हणालो–
बस झालं...
किती वाद घालशील
कधीतरी थोडंफार
मनासारखं वागशील
तो म्हणाला–
मी नाही तू बदललं पाहिजे
मी नशीब आहे तुझं
तू माझ्या तालावर
नाचलं पाहिजे

एवढा वाद झाल्यावर
इतकं पक्कं कळलं
अन् तेव्हापासून नशिबाला
दोष देणं टाळलं.

# ३८. आजकाल

आजकाल म्हणे तू तुझ्याशी पण बोलत नाही
म्हणून का मग मला उचकी वगैरेही लागत नाही

तुझ्या प्रेमात बुडालो मी, बोलतात लोक सारे
खरे सांगू मला तसे पोहता वगैरेही येत नाही

वाळलेले पान मी, पुस्तकात तरी ठेव जरा
आजकाल तू म्हणे पुस्तक वगैरेही वाचत नाही



शांतच असतो मी, तू जवळ असताना
रणांगणात तसे मी शस्त्र वगैरेही वापरत नाही

जन्म सारा गेला जरी उन्हात चालताना
कल्पवृक्षाकडे मी सावली वगैरेही मागत नाही

तू घेऊन येतेस छत्री मला भेटायला येताना
हल्ली आपण भेटल्यावर तसा पाऊसही पडत नाही.

# ३१. गुलमोहर



पान-पान सोडून गेले
शोक नाही केला
गीतेमधला स्थितप्रज्ञ
मला तो भासला...

भर उन्हात माझ्या दारी
गुलमोहर फुलला

निष्पर्ण फांद्याचा भार केवळ
कोणीही न येई निवाऱ्याला
सर्व काही त्यागूनही
खंत ना मनाला
वृक्षांचा फिनिक्स होऊन
तो पुन्हा मोहरला

भर उन्हात माझ्या दारी
गुलमोहर फुलला

हिरवाईची शाल सोडूनी
भगवी वस्त्रे ल्याला
जणू राजपाट सोडूनी
अशोक संन्यस्त झाला

भर उन्हात माझ्या दारी
गुलमोहर फुलला.

# ४०. बाप

बाप म्हणजे बाप असतो
कटकट नुसती...
डोक्याला ताप असतो

सकाळी लवकर उठ, व्यायाम कर
शाळेच्या तयारीसाठी
फिरतो माझ्यामागे घरभर...
बाप म्हणजे बाप असतो
कटकट नुसती...
डोक्याला ताप असतो



टीव्ही जास्त पाहू नको
सतत मोबाइलवर खेळू नको
जंक फूडपासून दूर राहा
मैदानी खेळ खेळून पाहा
उपदेशाचे डोस नुसते
पाजत असतो दिवसभर...
बाप म्हणजे बाप असतो
कटकट नुसती...
डोक्याला ताप असतो

अभ्यास कर, मोठा हो
भोगले मी जे
ते तुझ्या नशिबी न येवो
एकच याचा घोशा
सावली सुखाची मिळावी
तुला आयुष्यभर...

बाप म्हणजे बाप असतो
कटकट नुसती...
डोक्याला ताप असतो



मला काही लागलं की
डोळे याचे भरतात
बरं नसलं मला की
याचे हात थरथरतात
सतत माझाच विचार डोक्यात
असतो आयुष्यभर...
बाप म्हणजे बाप असतो
कटकट नुसती...
डोक्याला ताप असतो

कळत नाही मला
कसलं सुख मिळतं याला
मला कुशीत घेतल्यावर
कसं भरत असेल पोट याचं
मी पोटभर खाल्ल्यावर

अलगद थोपटत पाठ माझी
हसून म्हणतो तो
सगळं कळेल बेटा तुला
तू बाप झाल्यावर...

(आता मुलगा मोठा झाला आहे...)

आता माझा बाप मी
शोधतो दूर ढगात
कळलं आता मला
बापासारखा मित्र
नसतो दुसरा जगात
बाप म्हणजे बाप असतो
बाप म्हणजे बापच असतो
इवल्याशा रोपट्याचा वटवृक्ष करणारा
दैवी हात असतो.

# ४१. पाऊस आणि मी

माझं आणि पावसाचं
एक बरं आहे
दाटून येणं, कोसळणं
अन् वाहून जाणं
सारं सारं खरं आहे

मला आणि पावसाला
आठवणींची जोड आहे
पावसाला आणि मला
कवितेची ओढ आहे

पाऊस आणि मी
पुन्हापुन्हा भेटतो
मुके मुके राहून
सारं काही बोलतो

मला न सांगताच पाऊस
दूर दूर निघून जातो
मग डोळ्यात प्राण आणून
मी पुन्हा पावसाळ्याची वाट पाहतो.



# ४२. प्रेम

गालावरचे हसू म्हणजे प्रेम असतं
डोळ्यामधील आसू म्हणजे प्रेम असतं
प्रेम एक चटका असतो...
कधी कधी कुणासाठी तो एक 'फटका' असतो

दोन जिवांचा मेळ म्हणजे प्रेम असतं
नशिबाचा खेळ म्हणजे प्रेम असतं
प्रेम म्हणजे काव्याचा अविष्कार असतो
कुणासाठी प्रेम म्हणजे रुक्ष एक व्यवहार असतो

खरंखुरं प्रेम डोळ्यातून दिसतं
प्रेम म्हणून कुणी खोटं खोटं हसतं
दोन अक्षरी शब्द हा, सर्वांसाठी सारखा नसतो
फूल वाटते कुणाला अन् काटा कुणाला भासतो.



# ४३. आयुष्याचं गणित



किती हिशेब केले
किती हातचे दिले घेतले

किती केल्या बेरजा अन्
काही वजा केले

गुणाकार भागाकाराचा
किती मांडला बाजार

एवढं सारं करूनही
उत्तर बरोबर आलं नाही

अन् आयुष्याचं गणित
काही केल्या जुळलं नाही.

# ४४. शब्दार्थ

शब्दांना आपण बोलतो
नेमके तेवढेच अर्थ असतात,
की.......?




ज्याचा त्याचा - ज्याने त्याने काढायचा असतो अर्थ
आपल्या आपल्या सोयीचा
वेळप्रसंगानुसार

मग सुरू होतात शब्दांची युद्धं
माझे शब्द खरे की तुझा अर्थ
अन् जन्म निघून जातो
शब्दांचे प्रत्येकाला प्रत्येक वेळी वाटणारे अर्थ शोधण्यात

मग धुमसत राहतात
मनामनात
शब्दांनी पेटवलेले वणवे...

# ४५. जगता आलं पाहिजे...



थुईथुई नाचत येतात
पावसाचे थेंब
आपली ओंजळ पुढे करून
ते अलगद टिपता आले पाहिजे

लाल-पिवळी फुले जोडून
सुंदर होते माला
तसे आयुष्य गुंफून
सुंदर सजविता आले पाहिजे

आपल्याच नादात गोड गाते कोकिळा
तसे मस्तीत गाता आलं पाहिजे
सूरतालांची बहरावी सुरेल मैफल
तसे आयुष्य जगता आलं पाहिजे

रडलो होतो येताना...
सारं-सारं सहन केलं जीवन रोज जगताना
पण जातांना मात्र
हसत-हसत जाता आलं पाहिजे

पण जातांना मात्र
हसत-हसत जाता आलं पाहिजे.

# ४६. प्रश्न

काही काही प्रश्न
अचानक उभे राहतात समोर
अन् मागतात उत्तरे त्यांची
जी मलाच मिळाली नाहीत जन्मभर

वागतात ते माझ्याशी
एखाद्या क्रूर निर्दयी सावकारासारखे
मी मात्र गप्प उभा राहतो
कर्ज फेडण्यास असमर्थ असलेल्या
कर्जदारासारखा

पुन्हा देतो शब्द
आयुष्याच्या पुढच्या वळणावर
उत्तरे शोधण्याचा

मात्र त्याच वेळी पक्क माहीत असतं
हे सर्व प्रश्न अनुत्तरित घेऊनच
संपेल इथला प्रवास...
कर्जबाजारी माणूस
कर्ज न फेडता आल्याने
गळफास घेऊन संपवतो तसा.



# ४७. एकांताने विचारले...



एकांताने विचारले लाख प्रश्न मजला
याचसाठी टाळत होतो मी एकांताला

नाही गवसलो अजून मीच मला
काय सांगू ओळख, माझी या जगाला

मलाही वाटले जरा बोलावे जगाशी
मुखवटे चढवून बोलणे, रुचले नाही मनाला

पाऊस होता, हिरवळ होती, सुगंधी दरबार होता
पण या दरबारात बसणे, मंजूर नव्हते दैवाला

किती धावा केला तुझा, पण तू आलाच नाही
काहीतरी महत्त्वाचे, काम असावे देवाला.

# ४८. खड्डे



अरेरे किती हे खड्डे
काही मोठे, काही लहान

या खड्ड्यांतून जातांना धक्के बसतात
कधी सौम्य तर कधी तीव्र

कितीही डागडुजी केली तरीही
खड्डे पुन्हापुन्हा उघडतात

या खड्ड्यांचा जास्तच त्रास होतो
विशेषत: पावसाळ्यात

पण प्रेमाची एक फुंकर घातली तर
हे खड्डे लगेच भरतात म्हणे

...होय मी मनाच्या खड्ड्यांबद्दलच बोलतोय.

# ४१. एक अनामिक हुरहुर



एक अनामिक हुरहुर
घर करून बसलीय मनात
काहीतरी हातातून
निसटून गेल्याची
व काहीतरी हातालाच
न लागल्याची

एक अनामिक हुरहुर
खोलं रुतून बसलीय मनात
काहीतरी अपूर्ण राहिल्याची
अन् काहीतरी पूर्णत्वाला
नेता न आल्याची

एक अनामिक हुरहुर,
सतत राहते मनात
मनासारखं जगता
न आल्याची,
किंवा जगण्याला
कवेत घेता न आल्याची

एक अनामिक हुरहुर
सलत राहते मनात,
एक अनामिक हुरहुर
सोबत असते जीवनात.

# ५०. पोतराज

कडाड, कडाडऽऽऽ...
एक आवाज बाहेरून आला
बाहेर पाहिले तर
एक पोतराज मारून घेत होता स्वत:ला

काय असा घडला गुन्हा
कशाची ही आली चीड
आयुष्याला ही अशी
कशी लागली कीड

कशाचा हा संताप
इतका अनावर झाला
उगीच का असं कुणी
मारून घेतं आपल्याला



प्रश्नांच्या या गर्दीत
जीव हरवून गेला
अन् एवढ्यात
कडाड, कडाडऽऽऽ...
एक आवाज आतून आला.

# ५१. पाऊस : अक्राळविक्राळ

पाऊस अक्राळविक्राळ पडून गेला
काहीतरी चुकतंय सांगून गेला

उगीच का असं धो धो कोसळतं कुणी
उगीच का येतं डोंगराच्या डोळ्याला पाणी

वारा असा वेडापिसा उगाच धावत सुटतो
आभाळातून आगीचा लोळ धरणीवर पडतो

नदीलाही होतो मग राग अनावर
वाडी-वस्ती, घर-संसार तरंगत जातो पाण्यावर

ओरडून ओरडून सांगतात ढग, तुझ्यापुढे जोडतो कर
आतातरी जागा हो माणसा, पर्यावरणाचं रक्षण कर
...माणसा, पर्यावरणाचं रक्षण कर.



# ५२. आनंदाचे तळे

एक लहान मूल नित्यनेमाने
तळ्याकाठी जाऊन बसायचे
तासन्तास तळ्याकडे पाहत राहायचे
हसायचे, खेळायचे, तळ्याशी बोलायचे
परत येताना आनंदाचे एक तळे
आपल्या आत घेऊन यायचे

आता मात्र तो तळ्याकडे जात नाही
तळं दिसलं तरी, त्याच्याकडे पाहत नाही
कट्टीच जणू घेतली त्याने
आता तो तळ्याशी बोलत नाही

हळूहळू तळ्याचं पाणी आटू लागलं
त्यालाही आतून वाईट वाटू लागलं
पाहता पाहता कोरडेठाक झाले तळे
असे काय अघटित घडले, त्यालाही न कळे.



# ५३. जीवनाष्टक

कोण किती दु:ख देतो
हिशेब कशास ठेवावा
प्राक्तनाचे भोग सारे
अर्थ इतुका जाणावा ।।१।।

कशास फाटे आडमार्गाचे
सरळ रस्ता निवडावा
व्यर्थ निंदा इतरांची
उगाच वेळ न दवडावा ।।२।।

सत्य जरी का असेल कटू
हात त्याचाच धरावा
खोट्यानाट्या भूलथापा
मोह न त्याचा करावा ।।३।।

श्रद्धा असू द्या ईश्वरावरी
परी कर्माची पूजा सोडू नका
जात-पात, धर्म-पंथ
मनात भिंती बांधू नका ।।४।।

करा साधना सरस्वतीची
पथ ध्येयाचा सोडू नका
कष्टाविना मिळे ना फळ
मंत्र कधी हा विसरू नका ।।५।।



पैसा येतो आणिक जातो
गर्व तयाचा करू नका
मंत्र तंत्र अन् भोंदू बाबा
नादी त्यांच्या लागू नका ।।६।।

संकटापुढे हार मानणे
विचार ऐसा करू नका
या मातीतील शूरवीरांचा
इतिहास कधी विसरू नका ।।७।।

धन्य भाग्य हे...
मनुष्य जन्म आहे लाभला
भांडण, तंटे, वाद करून
व्यर्थ तया घालवू नका ।।८।।

काय लिहिले, काय बोलले
सुधीर, नवे यात काही नसे
जीवन बागेतील विचारपुष्पे
चरणी आपल्या वाहत असे.



# ५४. कविता

मी असा वेंधळा
पडलो होतो उदास लोळत
अचानक मग सुहास्य वदने
ती आली खेळत खेळत



हात धरूनी माझा
मला म्हणाली चल जाऊ दूर दूर
नदी, पर्वत, चंद्र, तारे
पाहून घेऊ भरपूर

पाहुनी तिजला मग
पारिजात फुलला मनी
खुलुनी आल्या दाही दिशा
अन् गंध दरवळला गगनी

असा कसा हा
बदल झाला अचानक आता
हसूनी मग बोलले ते
सुचली याला कविता.

# ५१. आजार

एकदा मी डॉक्टरांकडे जाऊन
नाराजीच्या सुरात सांगितले
आजकाल कविता सुचतात मला



गंभीर करून चेहरा मग तेही म्हणाले
भयंकरच आजार आहे हा
बरेच करावे लागतील उपचार
यातून बरे व्हायला

मख्खपणे पाहत जा आजूबाजूला
फार विचार करू नको
संवेदना-संवेदना म्हणतात ज्याला
फार थारा देऊ नको

कोणत्याही घटनेचा
खोलात जाऊन नको करू विचार
हे नाही बरे ...
त्याने जास्तच बळावेल तुझा आजार

आणि हो, चंद्र वगैरे एक ग्रहच आहे
त्याला वेगळा अर्थ देऊ नको
चांदण्या असतातच आभाळात
त्यात सौंदर्य शोधू नको

शक्य झाल्यास पावसाळ्यात
घट्ट कोंडून घेत जा स्वत:ला
उगीच मोकळी करून देऊ नको
वाट तुझ्या दु:खाला

बोथट कर
तुझ्या विचारांची धार
कवी म्हणून नको
घालून घेऊ गळ्यात हार

ऐकून सारे डॉक्टरांचे
आला विचार मनात खरा
एवढ्या सगळ्या उपचारांपेक्षा
आहे तो आजार बरा.

# ५६. बालपणीचा पाऊस

माझ्या बालपणीचा पाऊस आता मोठा झाला
पावसात भिजण्याचा मला कंटाळा आला

बालपणी त्याच्या वाटेकडे डोळे लावून बसायचो
खोटा पैसा देऊन त्याला गाणी म्हणत बोलवायचो
तोही बिचारा मैत्रीला जागायचा
मी हाक दिली की धो धो पळत यायचा
मला आतून बाहेरून चिंब भिजवायचा

दिवसभर आमची मग खूप मस्ती चालायची
तो आला म्हणून शाळेला सुट्टीदेखील मिळायची
नुसतं अंगणच नाही तर, दारं, खिडक्या,
छतातून तो घरातदेखील यायचा
तेव्हा आमच्या मैत्रीत भेदभाव नसायचा



आता मात्र तसं नाही, खोटं नाणं खिशात नाही
औपचारिकता म्हणून येतो तो, पण उंबरा ओलांडत नाही
तो बाहेर, मी आत आता उराउरी भेट होत नाही
आता तो आला की चिडचिड होते
इस्त्रीचे कपडे, मोबाइल, पाकीट भिजेल म्हणून काळजी वाटते

तो नेमका ऑफिसच्या वेळेवर येतो
मग मी देखील त्याला नित्य नेमाने टाळतो
माहीत आहे हे मित्राला टाळणं बरं दिसत नाही
पण पाऊस आला म्हणून ऑफिसला सुट्टी मिळत नाही

कधी कधी ओझरती भेट होते, पण बोलावं वाटत नाही
कपडे ओले होतात थोडे, पण ओलावा जाणवत नाही

कपडे ओले होतात थोडे, पण ओलावा जाणवत नाही.



# ५७. मिलन

केस मोकळे, सोड आपुले
पुरे झाले लाजणे...
तुझ्याचसाठी आभाळात
आज शिंपले चांदणे



बोल असे मधाळ काही
कशास मौन हे सजणे...
का असा फिरवतेस चेहरा
उगाच लाडिक रुसणे

बोलू दे या डोळ्यांनाही
आज गुपित मनीचे...
शब्द संपले तरीही
खेळ सुरू स्पर्शाचे

बघ चंद्र हा नभीचा
लाजून लाल झाला
दिला संकेत मोगऱ्याने
हो सज्ज मिलनाला.

# ५८. मुखवटे

तो चेहरा होता साधा
पण माणूस बेरकी निघाला
वाटले असावा गुलाब तो
पण रक्ताळलेला सुरा निघाला

ही भाषा मुखवट्यांची
मला कळली नाही
हा हिशोब नात्यांचा
कधीच जुळला नाही

मानले आपला ज्याला
त्यानेच घात केला
कोण कुठला अनोळखी
घर मनात करून राहिला.



# ५१. साक्ष



येऊ नकोस तू
या अशा कातरवेळी
कृष्णास भेटूनी बघ
राधा सावळी झाली

सोडू नकोस कुंतल
मोकळे वाऱ्यावरी
विचारेल जग तुला
ही खोडी कुणी केली

पैंजणाचे नाद सारे
ऐकतील लोक हे
शोधतील मग तुला
मी जिथे-जिथे आहे

एकदा ये स्वप्नात
झोपल्यावर जग सारे
तुझ्या माझ्या मिलनाची
साक्ष देतील चंद्र तारे.

# ६० शब्दांचे खेळ

तेच तेच शब्दांचे खेळ
खेळावे किती?
कोमेजलेल्या दु:खाला
गोंजारावे किती?

ती आहे अगदी
तशीच आहे...
रोज रोज तिच्यावर
लिहावे किती?



तुझ्या माझ्या प्रेमाशी
त्या चंद्राला काय घेणे
उगीच त्याला आपल्यात
गुंतवावे किती?

गुलाब चाफा मोगरा
आहे तिथे बरा आहे
त्यांना सांग कवितेत
माळावे किती?

शब्दांसोबत जगतो
इतके मात्र खरे आहे
शब्द येतात धावून मग
शब्दांना टाळावे किती?

# ६१. मधुमास

झेललेस वार सारे,
मी कुठे नाही म्हणालो
तुला उगाच खंत वाटली
मी कुठे काही म्हणालो

या इथे वळणावरी
भेटेन सुख वाटले
दिली हुलकावणी त्याने
मी कुठे गद्दार म्हणालो

हृदयात खोल जखमा
ओझे डोईवरी किती
दु:खं जी आहेत अंतरी
मी त्यांना यार म्हणालो

करपले आयुष्य सारे
ताटातील भाकरीसारखे
जे वाढले पात्रात
मी त्याला सुग्रास म्हणालो

बारमाही उन्हात भिजलो
कोरड्या पुरात वाहिलो
डोळ्यातल्या आसवांना
श्रावणाची सर म्हणालो



हसलीस तू जराशी
बोलली जरा प्रेमाने
एवढ्या या सुखास
मी मधुमास म्हणालो.

# ६२. वेळ



हार कसली जीत कसली
हा सारा खेळ आहे
ती तुझी वेळ होती
ही माझी वेळ आहे

ऊन कसले छाया कसली
हा एक प्रवास आहे
आज दु:ख सोबतीला
उद्या सुखाची पहाट आहे

आसू कसले हासू कसले
हा भावनांचा प्रांत आहे
आज एकांत जीवघेणा
उद्या मैफल रंगणार आहे

रंक कसले राव कसले
हा लक्ष्मीचा वास आहे
आज झोपतो उपाशी
उद्या सुग्रास जेवतो आहे

सुख: कसले दु:ख कसले
हा एक प्रवाह आहे
आज सूर्य डोईवर
उद्या पौर्णिमेची रात्र आहे.

# ६३. जिंदगी

आज मारलीस मला
ठोकर जिंदगी
तुझ्या बाजारात नाही
भाव जिंदगी

तो गुलाब फसवा होता
ते काटे प्रेमळ होते
मी कधी सांग मोजल्या
जखमा जिंदगी

ती वाट अनोळखी होती
तो प्रवास खडतर होता
हातात हात मी माझाच
घेतला जिंदगी

ते हसले मला
पाहून पराभूत
मी अजून हार कोठे
मानली जिंदगी.



# ६४. सोबत

त्या पावसाळी दुपारी
तू सहजच समोर दिसली
माझ्या हातात छत्री
तू नेहमीप्रमाणे विसरली

नजरानजर झाली
अन् उपचार म्हणून
ओळखीचं हसली

तू जाणीवपूर्वक माझ्यासोबत
छत्रीत येणं टाळलं
माझ्यापासून दूर राहण्याचं
तुझं वचन पाळलं

बहुतेक आपल्या वाटाही
सोबतच चालल्या होत्या
फरक फक्त एवढाच की
मी रस्त्याच्या एका बाजूला
आणि तू दुसऱ्या बाजूला

तुला तेवढंही आवडलं
नसावं कदाचित
तू अचानक वळणावर वळली
तेंव्हा वाट चुकल्याचे भाव
तुझ्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसले



मी मात्र तसाच चालत राहिलो
तू रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला
माझ्या सोबतच चालत आहे
असं गृहीत धरून.

# ६५. पाऊस

आधी वाटलं
पावसावर काहीतरी लिहावं

मग वाटलं
पावसात चिंब भिजावं

मन म्हणालं
पाऊस होऊन वाहत जावं...

मन म्हणालं
पाऊस होऊन वाहत जावं.



# ६६. सांगावा

तुला जमत नसेल यायला
तर किमान पत्र पाठव
इथे ढगांनी केली गर्दी
तू पत्रातून पाऊस पाठव

अजून किती मारणार हाका
इतकाही तू दूर नाही
तुला ऐकू येत नाही, की ऐकायचं नाही
एवढा फक्त निरोप पाठव

तू रमलास नव्या जगात
विसरून वचने सारी
तुझ्या माझ्यात सारेऽऽ आलबेल
फक्त एवढा सांगावा पाठव.



# ६७. भग्न अवशेष

सरत राहतं आयुष्य
विरत जातो देह
धडकत राहतात लाटा
खचत जातो किनारा

मग एक एक करत
ढासळतात बुरूज...
आणि गर्दी होते माणसांची
भग्न अवशेष पाहण्यासाठी.



# ६८. वतनदारी

कधी सांग मी मागणी केली सुखाची
कधी सांग मी बोललो, आहे उपाशी?

मला कुठे हवी ती थाळी द्रौपदीची
पुरे आहे सोबतीला शिदोरी व्यथांची

कधी मी आसवांनी केले खुलासे?
कधी सांग मी दिले खोटे दिलासे

मला ही उन्हाची लाभली वतनदारी
कधी मी सावलीला आलो तुझ्या दारी.



# ६१. डाव

का तुला गवसले नाही
गाव माझे
का तुझ्या ओठी न आले
नाव माझे

मी कितीदा बोललो
शब्दाविना
का तुला कळलेच नाही
भाव माझे

तू चाललीस हिरव्या
गवतावरी
बघ जरासे रक्ताळलेले
घाव माझे

तू हसलीस जराशी
शेवटी
पण मला कुठे कळले
डाव तुझे.



# ७०. मला नाही...

मला नाही, या शब्दांना स्पर्शून जा
त्याची गझल होईल...



जगण्यासाठी कुणाला
काहीतरी कारण होईल

मला नाही, या शब्दांना स्पर्शून जा
त्याची गझल होईल...

तुझ्या माझ्या मनाला
जखम नवी होईल

मला नाही, या शब्दांना स्पर्शून जा
त्याची गझल होईल...

मारवा नको, भैरवी ऐकून जा
या मैफलीची सांगता होईल.

# ७१. आधार

चढताना जिन्याच्या कठड्याचा...
उतरताना कुणाच्या तरी हातांचा...
बसताना खुर्चीचा...
उठताना टेबलाचा...
झोपताना पलंगाचा...
अन् झोक गेलाच तर
बाजूच्या भिंतीचा...
असा सतत कुणाचा न कुणाचा
आधार घेत असतो आपण...

पण या आधाराची धार आता
थोडी कमी करायला पाहिजे
आयुष्याच्या संध्याकाळी
एकटं एकटं जगता आलं पाहिजे.



# ७२. तुझ्यासाठी एक कविता जपून ठेवलीय...

तू येतेयेस ना...
मी एक कविता जपून ठेवलीय
तुझ्यासाठी

ती सुकून जाऊ नये म्हणून
माझे दोन डोळे तिला सतत
पाणी घालत असतात
तिला एकटं एकटं वाटू नये म्हणून
माझी दुःखं तिच्याशी बोलत बसतात

ती तशीच सुगंधित राहावी म्हणून
मी दरवळतो अधूनमधून
तुझ्या आठवणीने
पण ती मात्र विव्हळत असते
तुझ्या विरहाने

आताशा संध्याकाळ टळून
अंधारायला लागलंय
माझंही काळीज भीतीने
घाबरायला लागलंय
तू कदाचित वाट चुकलीस तर...?

पण मला माहीत आहे
तू येशील
कदाचित माझ्या शेवटच्या
श्वासाला



तू अंधारात ठेचाळू नये म्हणून
दारात एक पणती तेवत ठेवलीय...
तुझ्यासाठी
मी एक कविता जपून ठेवलीय.

# ७३. आजकाल कवीला काहीच सुचत नाही

आकाशात ढग येतात
पावसाच्या धारा नाचतात
त्याचं कवीला काहीच वाटत नाही
खिडकीतून येणारे पावसाचे
थेंबसुद्धा त्याला चालत नाही
तो खिडकीच्या काचा घट्ट बंद करतो
पावसाशी असलेलं नातं कायमच तोडतो
कोसळणारा पाऊस पाहून
आता कवी शहारत नाही
आजकाल कवीला काहीच सुचत नाही



गुलाबी थंडीत तो कानटोपी घालतो
धुक्याची चादर पांघरायचे मुद्दामच टाळतो
वाफाळलेला आले चहा
आता त्याला गोड लागत नाही
आजकाल कवीला काहीच सुचत नाही

उन्हाची चाहूल लागते
कोकिळा गाऊ लागते
चाफा बहरू लागतो
गुलमोहर फुलू लागतो
कवी मात्र या साऱ्यांकडे कानाडोळा करतो
पानगळ पाहूनदेखील कवी आता व्याकूळ होत नाही
आजकाल कवीला काहीच सुचत नाही

पौर्णिमेचा चंद्र पाहून
तिची आठवण येत नाही
कवी आता वेड्यागत
रात्र रात्र जागत नाही
रातराणीचा सुगंध त्याला आता धुंद करत नाही
आजकाल कवीला काहीच सुचत नाही

चारचौघात कवी आता
शहाण्यासारखा वागतो
जगाच्या चौकटीत
अगदी फिट्ट बसतो
कवितेचं वेड त्याला
आता वेडा करत नाही
आजकाल कवीला काहीच सुचत नाही

थुई थुई शब्द नाचत येतात
कवीकडे पाहून खुणावत राहतात
कवी मात्र आता त्यांना
ओळखही दाखवत नाही
आजकाल कवीला काहीच सुचत नाही

कवी काही लिहीत नाही
अगदीच असं होत नाही
महिन्याची किराणाची यादी,
खर्चाची डायरी, कवी नियमित लिहितो
सगळा हिशोब एकदम चोख ठेवतो
पण खरं सांगू यात त्याचं मन रमत नाही
हिशोब सारा जुळनही...
कुठे काय चुकतं... कवीला काही कळत नाही
अन् आजकाल कवीला काहीच सुचत नाही.

# ७४. जगण्याचा उत्सव व्हावा

निळा, हिरवा, भगवा
वावडे नसावे रंगाचे
फुलपाखरासम फुलाफुलातूनी
आनंदाने बागडायचे
असे जगावे निखळ निर्मळ
पाण्यासही वाटो हेवा....
जगण्याचा उत्सव व्हावा

बहर येई रात्रीतूनी
सुगंधी शुभ्र पुष्पांना
सढळ हस्ते द्यावे उधळूनी
प्रातःकाळी सर्व तयांना
असे जगावे सहज सुंदर
प्राजक्तासही वाटो हेवा....
जगण्याचा उत्सव व्हावा

भक्तिशक्तीचा घेऊन वसा
कास धरावी सत्याची
निष्ठा असता कर्मावर
कशास भीती ताऱ्यांची
असे जगावे उदात्त उत्तम
काळासही वाटो हेवा ....
जगण्याचा उत्सव व्हावा.



# ७५. स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव



स्वातंत्र्याला पंच्याहत्तर वर्षे झाली
अन् घरोघरी तिरंगा फडकला
देशभक्तीच्या रंगात
सारा देश न्हाऊन निघाला

गुलामीच्या शृंखला विरून गेल्या
स्वातंत्र्याचा सूर्य उगवला
पंच्याहत्तर वर्षात देशाने
गौरवशाली इतिहास घडविला

युद्धखोर जगाला भारताने
शांतीचा संदेश दिला
आत्मनिर्भर भारत पाहून
बुद्ध अभिमानाने हसला

अमंगल सारे सोडून मागे
नवी पहाट आली दारी
पाहता पाहता मंगळावर झेप
पाहता पाहता चंद्रावर स्वारी

या रे या रे सारे जण
ऋण भारतभूचे फेडू
धर्म, जात, पंथ विसरूनी
माणूस माणूस जोडू.

# ७६. माझी कविता

**ती** मला नेहमीच
**एकांता**त भेटते
असे नाही



**कधी कधी** भेटते ती
गजबजलेल्या **बाजारा**त
**माणूस** आणि माणुसकी शोधताना

**सुख-दु:खा**च्या चार गोष्टी होतात मग
जीव कासावीस होतो तिचा
इथल्या शब्दांचे **शब्दार्थ** शोधण्यात

**ही तुझी दुनिया,** नाही पटत मला
अगदी स्पष्ट सांगते
पण तेवढीच हळवी होऊन
**हे बंध रेशमाचे...**
कानात गोड कुजबुजते

तिच्या पुढे नतमस्तक होऊन
**सलाम** करतो मी तिला

**'माझी कविता'** म्हणतो मी तिला.

# ७७. एकटा

एकट्या वाटेने
एकटाच जातो मी
सुन्या माझ्या मैफलीत
एकटाच गातो मी

एकट्या माझ्या श्रावणाची
सर ही एकच असते
मी जिथे थांबतो
त्या झाडाला सावलीही नसते

एकच असते वाट माझी
तिला फाटे नसतात
फुलांच्याही बागेत माझ्या
सारे काटेच असतात.



# ७८. शोध देवाचा

देवालाही कंटाळा येतो
रोज रोज गाभाऱ्यात
नटूनथटून बसण्याचा

मग बरीच हिंमत करून
तो हळूच मूर्तीबाहेर येतो
एका भोळ्या भाबड्या
भाविकाचा चेहरा लावून

गाभाऱ्यातील उदबत्त्यांचा धूर
कापराचा वास याने त्याचा
जीव गुदमरून जातो
मग नकळत तो गाभाऱ्यातून
सभामंडपात व सभामंडपातून
प्रदक्षिणा मार्गात येतो

हळूच बाहेर आल्यावर
तो एक दीर्घ श्वास घेतो
आणि स्वत:लाच एक
प्रदक्षिणा मारून
पाय मोकळे करतो



मंदिराच्या आवारातच मग तो रमतो
वडपिंपळाच्या झाडाखाली बसतो
भक्तांनी दिलेला गूळखोबऱ्याचा
प्रसाद मिटक्या मारत खातो

आता त्याला नकोसेच वाटते
पुन्हा गाभाऱ्यात जायला
अन् तो घर करून आनंदात राहतो
त्या भोळ्या भाबड्या भक्ताच्या हृदयात

इतक्यात गाभाऱ्यात
एकच हलकल्लोळ होतो
अन् वाऱ्यासारखी पसरते बातमी
देव गाभाऱ्यातून निघून गेल्याची

मग तेव्हापासून सुरू आहे शोध
तुमच्या माझ्यात वसलेल्या
त्या अनादी अनंताचा..

तुमच्या माझ्यात वसलेल्या
त्या अनादी अनंताचा.



# ७१. शिक्षा

भोगले मी किती, अन् भागले तू किती
प्रश्न हा अनुत्तरित आहे...
जुळवून बघ हिशेब एकदा
गुन्हा कोणता, अन् केवढी ही शिक्षा आहे

जगलो मी किती, अन् मोजले तू किती
प्रश्न हा अनाकलनीय आहे...
वळून बघ पुन्हा एकदा
शिणलेला तुझाच मी अंश आहे.



# ८०. लढाई

तुझ्यासवे लढताना
भान हरपूनी लढलो मी
श्वास-श्वास वेचले...
पण अखेरी हरलो मी

मानले नशिबा तुला
हा तुझाच खेळ रे
संपले सामर्थ्य माझे
आता तुझीच वेळ रे.



# ८१. कुठे तरी दूर देशी

कुठे तरी दूर देशी
निघून जावे वाटते
गर्दीतही येथे मला
एकाकी वाटते

वीण नात्यातली
सैल होऊ लागली
माणसे ही येथली
रंग बदलू लागली
सारे काही असूनही
हातचे रे निसटते...

कुठे तरी दूर देशी
निघून जावे वाटते

चेहरे हे ओळखीचे
तेच आहेत आधीचे
की मुखवटे आहेत हे
आपापल्या सोईचे
खंत एक मनात
हीच अनोळखी दाटते...



कुठे तरी दूर देशी
निघून जावे वाटते

विसावे क्षणभरी
सावली अशी शोधतो
मन सुखावेल परी
अशी घटिका मागतो
या एकाच क्षणासाठी
आयुष्य सारे आटते...

कुठे तरी दूर देशी
निघून जावे वाटते
गर्दीतही येथे मला
एकाकी वाटते.



# ८२. पुन्हा भेटूच आपण ....

पुन्हा भेटूच आपण
कधीतरी
केव्हातरी
कोणत्यातरी वळणावर ....



पण,
कधी
केव्हा
कुठे भेटलो होतो
याची आठवण करून देण्याइतकी
ओळख विसरण्यापूर्वी
पुन्हा भेटूच आपण....

पुन्हा भेटूच आपण
कोठेतरी
कसेतरी
कोणत्यातरी वाटेवर ....

पण,
काल
आज
आणि उद्याही असणारा आपुलकीचा
ओलावा संपण्यापूर्वी
पुन्हा भेटूच आपण....

आणि अगदीच नाही जमलं तर
त्या दूरच्या प्रवासात
धुक्याच्या वाटेवर...
थोड अस्पष्ट दिसेल
पण तरीही
ओळखीचं हसू आपण
पुन्हा भेटूच आपण....
पुन्हा भेटूच आपण.



शब्द हवे असे
आकाश पेलणारे
तुझ्या माझ्या डोळ्यातलं
खरं खरं बोलणारे

लिहावे असे काही
रोम रोम झंकारून यावा
माझ्या कवितेच्या शब्दाशब्दात
देवा तुझा अंश दिसावा

माझ्या कवितेच्या शब्दाशब्दात
देवा तुझा अंश दिसावा.

\- सुधीर शास्त्री.